# दिनांक 02/03/2025

1. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/02/2025 रोजी 20:30 वा च्या सुमारास मौजे. शिवान्य ग्रीन फार्म हाउस,सालवड, पो.नसरापूर, ता.कर्जत येथे फिर्यादी रा. शिवान्य ग्रीन फार्म हाउस, सालवड,पो.नसरापूर,ता.कर्जत हे जेवणकरून घरी झोपण्याची तयारी करीत असताना कोणतरी त्यांचे फार्महाउसवर बॅटरी मारत असताना फिर्यादी यांनी त्यांना आवाज दिला की, कश्याला आमचे फार्महाउसवर बॅटरी मारतो असे बोलले असता त्या गोष्टीचा आरोपीत क्र 2 याने त्याचे हातातील लाकडी दांडक्याने फिर्यादी यांचे डोक्याचे डावे बाजूला व डाव्या खांदयाच्या बाजूला उपट मारून दुखापत केली तसेच आरोपी क्र.01,3 व 04 सर्व रा.सालवड, पो.नसरापूर ,ता.कर्जत यांनी संगनमत करून फिर्यादी हाताबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळी व जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.55/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118 (1),351(2)(3),352,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/राजेंद्र दुसाणे हे करीत आहेत.

2. म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/03/2025 रोजी 00:30 वा मौजे वांडबा गावचे हददीत म्हसळा कोणीतरी अज्ञात चोरटयांनी एकूण 20,000/- किमतीचा 63 के.व्ही.ट्रान्सकॉन कंपनीचा ट्रान्सफार्मर मधील अंदाजे 25 किलो वजनाची तांब्याची तार ही महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीचे संमतीशिवाय बेकायदेशीर लबाडीचे उददेशाने स्वतचे आर्थिक फायदयाकरीता चोरी करून घेवुन जावुन सदर ट्रान्सफार्मर मधील आईल खाली सांडवुन नुकसान केले आहे.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.11/2025, भारतीय न्याय संहीता कलम 2023 चे कलम 303[2],324[4] प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/ढवळे हे करीत आहेत.

3. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/02/2025 रोजी 12:00 वा च्या सुमारास मौजे कुंभीवली येथील मंगलम ब्रांड प्रा.लि कंपनी कुंभीवली या कंपनीचे कंपाउंड मध्ये ता.खालापुर येथे फिर्यादी रा.ब्लॉक ए-374/747, सुभाष टेकडी , कानसाई रोड, उल्हासनगर नंबर 4 हे काम करीत असलेल्या कंपनीचे जागेस तारेचे कंपाउंड करण्याचे काम सुरु होते. आरोपी क्र.01 व 02 हे तेथे येवुन कामगार लोकांना व आम्हाला शिवीगाळी करुन कंपाउंडचे काम थांबवुन तारेचे

कंपाउंड करीता लावलेले पोल (खांब) पाडुन नुकसान केले म्हणुन, फिर्यादी यांनी आरोपी यास सदर जागेचे कोणतेही कागदपत्रे तुमच्याकडे असल्यास ते आम्हाला दयावेत अन्यथा आपण मा. कोर्टात दावा दाखल करावा असे सांगितेले त्यावेळी आरोपी क्र 1 व 2 यांनी आम्ही कोर्टात जाणार नाही, आम्हाला 40,00,000/- रुपये एवढी रक्कम दिल्याशिवाय आम्ही तुम्हाला काम करु देणार नाही आणि तुम्ही जर काम केले तर तुमचे हातपाय तोडुन टाकु अशी धमकी दिली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.65/2025,भारतीय न्याय संहिता कलम 308(3),324 (2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/आवटी हे करीत आहेत.

4. नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/03/2025 रोजी 14:30 वा च्या सुमारास मौजे कुहिरे गावचे हद्दीत कुहिरे गेटजवळ नागोठणे पेझारी रोडवर, पेण येथे आरोपीत रा.शेतपळस, पोस्ट पळस, ता.रोहा याने त्याचे ताब्यातील बस क्र.एम.एच.43 बी.एक्स 7254 हि रिलायन्स कंपनीचे कुहीरे गेटमधुन नागोठणे पेझारी रोडवर घेत असताना दोन्ही बाजुकडील वाहने पाहणे आवश्यक असताना देखील त्याने त्याचे ताब्यातील बस अतिवेगाने रस्त्यावर आणल्याने तिची पेझारी बाजुकडुन नागोठणे बाजुकडे जाणारे यामाहा आर 15 मोटारसायकल क्रमांक एम.एच.06 सी.एन.0816 हीस धडक लागुन अपघात होवुन अपघातात मोटार सायकल चालक सुबोध उमेश मढवी यांस लहान मोठ्या स्वरुपाच्या दुखापती होणेस तसेच दोन्ही वाहनाने नुकसानीस कारणीभुत झाला व अपघाताची खबर न देता पळुन गेला.

याबाबत नागोठणे पोलीस ठाणे येथे गु.र.नं.10/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, 134, भारतीय न्याय संहिता 281, 125(a), 125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/सानप हे करीत आहेत.

5. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/09/2023 रोजी 23:00 वा ते दि. 09/07/2024 रोजी 23:00 वा च्या दरम्यान मौजे नेरळ दहीवली ता.कर्जत महिला फिर्यादी हिस आरोपीत क्र1 यांने तो राहत असलेल्या मौजे दहीवली येथील संतोष मराडे यांचे घरातील रूम मध्ये बोलवून लग्नाबाबत बोलणी करू असे सांगूण तुझे बरोबर लग्न करणार आहे माझी इच्छा झाली आहे तसे मी कोर्टात सुद्धा लिहून दिल आहे असे बोलून आरोपीत याने फिर्यादी हिचे इच्छेविरूद्ध तिचे सोबत शरीर संबंध प्रस्थापित करून तीस दोन महीन्यांची गर्भवती केले व सदर गर्भ पाडण्यास दि.13/11/2023 रोजी गर्भपात होण्याची गोळी देवून गर्भपात केले तसेच फिर्यादी यांनी आरोपीत क्र1 यास माझेसोबत लग्न कर असे वारंवार सांगून देखील त्याने लग्न न करता दि.09/07/2024 रोजी दृष्टी हॉटेल नेरळ या ठिकाणी बोलावून घेवून फिर्यादी हिस मारहाण करून शिवीगाळ करून जीवेठार मारण्याची धमकी दिली तसेच आरोपीत क्र.02,03 यांनी देखील फोन करून शिवीगाळी करून दमदाटी केली.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 25/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 69,89,115(1),351(1),351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास

मपोसई/प्राची पांगेहे करीत आहेत.

6. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/02/2025 रोजी 20:54 वा च्या सुमारास मौजे शिरवली ते रानसई रोडवरील पुलाजवळ व फिर्यादी याचे राहते घराचे समोर ता.खालापुर येथे , फिर्यादी रा.खालापूर हे त्याची मोटार सायकल क्रं एम.एच46/एएम 9597 वरुन साक्षीदार यास डब्बलशिट घेवुन वावोशि येथुन घरी रानसई येथे जात असताना यातील आरोपी क्रं 1. याने ताब्यातील कार क्रं एम.एच 01/ डी.बी 6824 ही फिर्यादी याचे मोटार सायकल जवळ आणुन थांबविली असता फिर्यादी यांनी त्यास कार वाकडी तिकडी का चालवितो असे विचारले असता त्याचा राग मनात धरुन फिर्यादी हे आदिवासी कातकरी समाजाचा आहे हे माहीत असताना देखील त्यांना, कातकरीच्या गांडीत कसा घोडा घालायचा ते आम्ही बघतो तसेच हे कातकरी काय करणार आमचे वाकडे, जास्त हुशारी केली तर तुला जीवातुन संपवु अशी दमदाटी केली 'तसेच तु जा, माझे काय करायचे ते करुन घे, मी तुला घाबरत नाही. अशी दमदाटी केली.त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपी क्रं 2 यास फोन करुन त्याबाबत सांगितले असता आरोपी याने देखील फिर्यादी यांना फोन वरुन तु फक्त माझे भावाला मारुन बघ, तु जर माझे भावाला मारलेस, तर तु जेथे भेटशील तेथे तुला मारीन, अशी दमदाटी केली यानंतर फिर्यादी हे घरी गेले असता आरोपी क्रं 2 व 3 यांनी फिर्यादी याचे घरा जवळ जावुन फिर्यादी व साक्षीदार यांना तु जर माझे भावाला हात जरी लावला तर तुला जिथे भेटशील तिथे तुला मारीन तसेच तु माझे वाकडयात गेलास तर तुला मारुन टाकीन अशी धमकी दिली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.66/2025अनुसुचित जाती/जमाती अधिनियम, 1989, इतर कलमांन्वये दाखल गुन्हे, अनुसुचित जाती/जमाती अधिनियम 1989 चे कलम 3(2)(va), 3(1)(rs), भारतीय न्याय संहिता कलम 352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.विक्रम कदम सो खालापुर विभाग हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 01.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 171 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,78,750/-रुपये इतका दंड आकारला आहे.